# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

/फॅक्स २५६५६२३४ **Email : : ropune.dte@gmail.com**

जा.क्र. विकापु/विवि/प्रथम वर्ष प्रवेश/२०११-१२/ E462 दिनांक : 1 AUG 2011

प्रति,

प्रथम वर्ष पदवी अभियांत्रिकी/ औषधनिर्माण शास्त्र /
वास्तुशास्त्र / एचएमसीटी प्रवेश अर्ज स्विकृती केंद्र

विषय : शैक्षणिक वर्ष २०११-१२ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी / औषधनिर्माण शास्त्र / वास्तुशास्त्र / एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबतचे धनाकर्ष जमा करण्याबाबत

संदर्भ : १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांवे पत्र क्र २अ/एडीएम/ऐआरसी/२०११/९५५ दिनांक २२/०७/२०११

२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांवे पत्र क्र २अ/एडीएम/ऐआरसी/२०११/९५६ दिनांक २२/०७/२०११

उपरोक्त विषयान्वये या कार्यालयाच्या अधिपत्याखाली असणा-या सर्व प्रथम वर्ष पदवी अभियांत्रिकी/ औषधनिर्माण शास्त्र / वास्तुशास्त्र / एचएमसीटी प्रवेश अर्ज स्विकृती केंद्राना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०११-१२ मधील सर्व अभ्यासक्रमाचे Submission of Online Application Form, Document Verification & Condimation चे काम विविध प्रवेश अर्ज स्विकृती केंद्रावर करण्यात आलेले आहे. त्या करीता संबंधीत उमेदवारांकडून प्रवेश अर्ज स्विकृती केंद्रावर रु.५००/- व रु. ७००/- एवढे शुल्क धनाकर्षाव्दारे स्विकारण्यात आले आहेत. सदरचे धनाकर्ष या कार्यालयास सादर करताना खालील प्रमाणे सादर करण्यात यावेत.

१) जमा करण्यात आलेल्या धनाकर्षाची दोन्ही बाजूची Preparation Line खालील फाडून धनाकर्ष रक्कमनिहाय व बॅकनिहाय वेगवेगळे करण्यात यावेत. व त्याची यादी करण्यात यावी.
२) यादी प्रमाणे धनाकर्ष लावण्यात यावेत.
३) सहा महिण्यापेक्षा कमी मुदत असलेले धनाकर्ष स्विकारण्यात येऊ नयेत.
४) सदरचे धनाकर्ष हे मुंबई येथील शाखेवर (Payable at Mumbai ) देय असणारे असावेत.
५) धनाकर्ष स्विकारताना The director, Technical Education, Mumbai या नावाने असल्याची खात्री करण्यात यावी.
६) रु. ५००-। व् रु. ७००/- पेक्षा कमी रकमेचे धनाकर्ष अथवा जास्त रकमेचे धनाकर्ष स्विकारण्यात येऊ नयेत.

वरील सर्व गोष्टीचे पालन करुन धनाकर्ष या कार्यालयास दिनांक ०६/०८/२०११ पुर्वी जमा करावेत.

(शिंगाडे)

प्र. सहसंचालककरीता

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : श्री. एस. बी. शिन्दे, प्रोग्रॅमर यांना कळविण्यात येते की, सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.